# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४०१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–११/०७/२०१६.

**१) शेतीच्या वादावरून भांडण करून गंभीर जखमी केल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक १०/०७/०१६ ते ११.०० वा. दर. फिर्यादी सौ. दर्शना रमेश भांडारकर वय ४० वर्ष, रा. किरमटी हि तिचा पती रमेश भांडारकर वय ४५ वर्ष यांच्या सोबत शेतावर गेली होती. आरोपीने त्याच्या बांधीतील पाणी फिर्यादी यांच्या शेतात सोडल्याने फिर्यादीने "तुम्ही फोडलेली खांड बांधुन घ्या" असे बोलली, यावरून आरोपीने "तुला खांड बाँधण्याचा अधीकार नाही." असे बोलला त्यावेळी फोडलेली खांड बांधण्यास फिर्यादीचा पती खांडेजवळ गेला यावरून आरोपीने हातातील लोखंडी खुरपीने फिर्यादीच्या पतीच्या नाकावर मारून गंभीर जखमी केले. असे फिर्यादीचे तोंडी व डॉ. परीक्षण अहवाला वरून पोलीस स्टेशन लांखादुर येथे कलम ३२६ भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी निंबेकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) पॉलीसीच्या पैश्यावरून धारदार वस्तुने मारून जखमी केले. :–**

दिनांक १०/०७/२०१६ रोजी २०.१५ वा. दर. फिर्यादी मंगेश गंगाधर पारडकर वय ३५ वर्ष, नेहरूनगर तुमसर येथील सलीमच्या पाणठेल्या जवळ उभा असतांना आरोपीने "मी तुझ्यामुळे २ ते ३ वर्षापासुन प्लस पॉलीसी भरत आहे,तु पैसे मला आत्ताच परत कर." असे बोलुन भांडण केले व खाली पाडुन थापडबुक्याने मारपीट केली व त्याच्या पायातील जोडयामधुन धारदार वस्तु काढुन फिर्यादिच्या हातावर मारून जखमी केले. असे फिर्यादीचे बयाण व डॉ. परीक्षण अहवाला वरून पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३२४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा ठाकणे, पो.स्टे. तुमसर हे करीत आहे.

**३) अवैध दारू अडयांवर धाडी. :–**

दिनांक १०/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पो.स्टे. मोहाडी, वरठी, गोबरवाही, लाखनी, पालांदुर व लाखांदुर येथील परीसरातील अवैध दारू अडयांवर धाडी घालुन एकुण ०६ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २५ लिटर हातभट्टी दारू कि. १३५०/–रू. व ०७ लिटर ९२० मिली. देशी दारू कि. २२४०/–रू. असा एकुण कि. ३५९०/–रू. चा माल जप्त करण्यात आला.

(श्री. गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.